MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक - दिपक थोरात

दिंद्रुड येथील दफन विधीच्या मुस्लिम समाजाचा वाद कब्रस्तान मध्ये दफनविधी न करून देता काही समाजकंटक आणि अडवल्यानंतर त्या ठिकाणी म्बुलन्स द्वारे संबंधित मृतदेह हा माजलगाव येथील एसडीएम कार्यालयामध्ये संतप्त नातेवाईकांनी व समाज बांधवांनी ठेवून शासनाकडे न्याय मागण्यासाठी गेलेल्या लोकांवर ही गुन्हे दाखल केले परंतु यावेळी म्बुलन्स चालकाची व म्बुलन्स का चूक आहे माजलगाव पोलीस स्टेशन ने गुन्हा दाखल कोणत्या आधारित केला आहे हे केतन राठोड यांनी स्पष्ट करावे तर केतन राठोड यांना निलंबित करण्यासाठी लवकरच मुस्लिम समाजासह १८ पगड जातीच्या संघटना पक्ष हे पोलीस अधीक्षक पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करणार आहेत?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२९० | शनिवार दि.१३ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -290 | SATURDAY DT. 13 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पिआय केतन राठोड म्हणजे हुकूमशाहीचा बादशहा का?

मुसलमानांवर राजकीयसुड उगवायला दिंद्रुड प्रकरणा पासून सुरुवात खासदार बजरंग सोनवणे पालकमंत्री धनंजय मुंडे आमदार प्रकाश सोळुंखे तुम्ही उत्तर द्या दिंद्रुड मधील प्रश्न तुम्हाला माहीत नाही का?

लोकसभा निवडणुकीचा बदला सुडाच्या भावनेने दिंद्रुडचा प्रश्न ताटकळत ठेवायचा आहे का?

केतन राठोड यांच्यावर राजकीय नेत्यांचा दबाव?

दिंद्रुड येथील मुस्लिम समाजावरील गुन्हे तात्काळ मागे घ्यावे-मुस्ताक कुरेशी

दिंद्रुड प्रकरणात मुस्लिम समाजाच्या दफन विधी वरून ती ७० जनावर ती गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत यामध्ये माजलगाव पोलीस स्टेशनचे केतन राठोड यांच्यावर कोणत्या नेतेमंडळीचा दबाव आहे का हे तपासणी गरजेचे आहे केतन राठोड हे मग्रुरी व आरे रवी भाषा करणारापैकी पोलीस अधिकारी आहे या अगोदर सुद्धा बीड येथील शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये वादग्रस्त ठरलेला अधिकारी म्हणून वेतन राठोड यांची ओळख आहे तर केतन राठोडच्या कार्यकाळामध्ये सध्या माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये किती आयुर्वेद धंदे चालत आहेत हे तपासणी गरजेचे आहे लवकरच माजलगाव शहर पोलीस स्टेशन अंतर्गत किती जागेवरती अव्यय दारू गुटखा मटका पत्त्याचे क्लब वेश्याव्यवसाय हे चालू आहेत हे लवकरच पुढील अंकांमध्ये वाचकांसाठी आम्ही जनतेसमोर मांडणार आहोत?

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव येथील असुन काल दि.०८/०७/२०२४ रोजी दिंद्रुड येथील मुस्लिम धर्मगुरु शेख सुलेमान यांची निधन झाल्यानंतर त्यांच्या दफनविधी करण्यास मज्जाव करणार्या तहसील व पोलिस प्रशासन संबंधित अधिकारी यांना तात्काळ निलंबित करुन तात्काळ गुन्हे दाखल करा तसेच राजकीय (दुत) व्यक्तीची चौकशी करुन कारवाई करा .

✻ माजलगाव शहर पोलिस निरीक्षक यांनी तर ७० जणांवर गुन्हे दाखल केले परंतु मुस्लिम समाज अंत्यविधी रोकले म्हणून त्यांनी त्या मृत्युदयाची अंत्यविधी साठी जागा नसल्यामुळे व पोलीस प्रशासन व संबंधित अधिकारी यांनी त्यांना रोखल्यामुळे त्या संदर्भात ते उपविभागीय अधिकारी समोर डेड बॉडी ठेवून न्याय मागत होते की आम्हाला जागा अंत्यविधीसाठी उपलब्ध करा नसता आमच्याकडे प्रयामार्ग नाही. त्याची दखल उपविभागीय अधिकारी यांनी घेऊन तात्काळ आदेश दिले दफन विधी करा, परंतु माजलगाव शहर पोलिस निरीक्षक यांनी तर मृत्यूच्या नातेवाईक यांना पण सोडले नाही त्यांच्यासह ७० लोकं गुन्हा दाखल केला आहे कोणत्या पद्धतीने न्याय मागायचं त्यांना त्याठिकाणी जाण्याची गरज नव्हती परंतु अंत्यविधी रोखल्यामुळे उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालय समोर न्याय मिळेल आणि लवकरत लवकर अंत्यविधी करु परंतु पोलिस निरीक्षक यांनी तर गुन्हे दाखल करुण गुन्हेगार केले

✻ मा.पोलिस अधीक्षक साहेब, यांनी एकतर गुन्हे मागे घ्यावे नाही तर दफनविधी करण्यास मज्जाव करणार्या तहसील व पोलिस प्रशासन संबंधित अधिकारी वर तात्काळ निलंबित करुण गुन्हे दाखल करा

कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील तहसील आणि पोलीस प्रशासनाने मुस्लिम धर्मगुरू (आमीर साहाब) यांचा दफनविधी का रोखण्यात आला हयात राजकीय व्यक्तिचा हात असुन हयाची तात्काळ चौकशी करण्यात यावे तसेच दिंद्रुड येथील बाजारतळा लगत असलेल्या कब्रस्तानच्या जागेचे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागेत कब्रस्तान असुन त्या जागेत शेकडो कबरी आहेत असे असतांना पोलीस प्रशासनाने तहसीलचे आदेश असल्याचे सांगून दफनविधी थांबण्यात आले हे प्रशासनावरची काळा दाग असुन एका विशिष्ट धर्मावर आघात करण्यात आली आहे हयात राजकीय (दुत) व्यक्ती असुन त्यांच्या बोलण्यावरून तहसील व पोलिस प्रशासनाने मुस्लिम धर्मगुरु यांचं मृतदेहाची हेळसांड केली असुन हयाची तात्काळ चौकशी करुन राजकीय (दुत) व्यक्ती, तहसील व पोलिस प्रशासनातील सर्व अधिकारी यांना निलंबित करुन तात्काळ गुन्हे दाखल करा नसता लोकशाही मार्गाने विविध प्रकार चे आंदोलन करण्यात येईल अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्ष वतिने मा.जिल्हाधिकारी यांच्या कडे ईमेल द्वारे करण्यात आली आहे

मान्सून ट्रॅकर- बिहारमध्ये वीज पडून २१ जणांचा मृत्यू

यूपीच्या शाळेत ३ फुटांपर्यंत पाणी, एमपीसह ८ राज्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा

नवी दिल्ली / प्रतिनिधी

बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. गेल्या २४ तासांत १२ जिल्ह्यांत वीज पडून २१ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातील नद्यांना पूर आला आहे. भागलपूरमधील गंगा आणि कोसी येथून पाण्याचा प्रवाह होत आहे. अनेक घरे नदीत बुडाली आहेत. काही लोकांना घरे सोडण्यास भाग पाडले आहे.

दुसरीकडे, उत्तर प्रदेशमध्ये नेपाळच्या सीमेला लागून असलेल्या जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. पीलीभीत, लखीमपूर खेरी, बहराइच, श्रावस्ती, बलरामपूर, सिद्धार्थनगर, महाराजगंज येथील सुमारे ८०० गावे सलग तिसऱ्या दिवशी पुराच्या विळख्यात आहेत. बलरामपूर येथील प्राथमिक शाळेत ३ फुटांपर्यंत पाणी तुंबले आहे.

यूपी-बिहार व्यतिरिक्त संपूर्ण देशात मुसळधार पाऊस सुरू आहे. हवामान खात्याने मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, पंजाब, हरियाणा, जम्मू, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

बिहार: मुख्यमंत्री नितीश म्हणाले- सावध राहा, घरात सुरक्षित राहा

बिहारच्या भागलपूरमध्ये कोसीचे संकट आहे. नदीचा प्रवाह तीव्र झाला आहे. गेल्या २४ तासांत वीज पडून मधुबनीमध्ये ६, औरंगाबादमध्ये ४ आणि पाटणामध्ये २ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याचवेळी रोहतास, भोजपूर, जेहानाबाद, सारण, कैमूर, गोपालगंज, लखीसराय, मधेपुरा आणि सुपौल येथे प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत. खराब हवामानात जनतेने पूर्ण सावध राहण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे. विजेपासून वाचण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करा. घरीच रहा आणि सुरक्षित रहा.दिल्ली-लखनौ महामार्गावरील शाहजहानपूरमध्ये सुमारे २ ते ३ फूट पाणी आहे. महामार्गाचा एक भाग सातत्याने बंद ठेवण्यात आला आहे.

उत्तराखंड : भूस्खलनामुळे बद्रीनाथ मार्गावर लांब जाम

बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळल्याने दोन्ही बाजूंनी मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. मात्र, प्रशासनाचे पथक वेगाने ढिगारा हटवत आहेत. बद्रीनाथमध्ये ११ जुलै रोजी पोटनिवडणुकीसाठी मतदान झाले होते. येथून परतणाऱ्या ३६ मतदान पक्षांना गुरुवारी ढिगाऱ्यातून पायी बाहेर काढण्यात आले.

मातंग समाजाकडून धर्माबादमध्ये रास्ता रोको आंदोलन

धर्माबाद / प्रतिनिधी
लोकस्वराज्य आंदोलन, सखल मातंग समाजच्या वतीने १२ जुलै रोजी लहुजी सावळे चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही मातंग समाजाला सामाजीक,शैक्षणिक आरक्षणाचा फायदा प्रत्यक्षात होत नाही.यामुळे समाजातील शिक्षित मुलांना कोणताच फायदा झालेला नाही.१ जुलै २०२४

पासून लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे हे जिल्हाधिकारी कार्यालय नादेड समोर विविध मागण्या घेऊन बेमुदत आमरण उपोषण सुरू केलेले आहे. या उपोषणाला बारा दिवस झाले आहे. प्रा.रामचंद्र भरांडे यांची तब्येत सतत खालावत आहे. त्यामुळे या उपोषणाला जाहीर समर्थनार्थ व लाभ वंचित घटकांना स्वतंत्र अ.ब.क. ड आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय राज्य सरकारने तातडीने घ्यावा. अशी न्यायाची मागणी घेऊन दि.१२ जुलै रोजी धर्माबाद तालुकातील लोकस्वराज्य आंदोलनचे पदाधिकारी, सखल मातंग समाजातील महिला व पुरुष,समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित राहून रस्ता रोको आंदोलन मध्ये सहभाग होऊन शांतता बाळगत यशस्वीरित्या पार पडला आहे. लोकस्वराज्य आंदोलन तालुकाध्यक्ष चंद्रकांत गोणारकर,तालुका उपाध्यक्ष संतोष काळेवार,शहराध्यक्ष अनिल गोनारकर बी.एम.गोनारकार, लक्ष्मण निदानकर, गी. आर गोणारकर,पत्रकार बाबुराव गोणारकर,नागोराव महाराज कमलाकर,जकोजी चरके, सत्यनारायण पवळे, बळीराम सूर्यवंशी,नागनाथ गोणारकर,अविनाश पिंगळे, श्रीकांत गोणारकर, साईनाथ गोणारकर, शिवकुमार गोणारकर,माधव गाडेकर, मारोती डाखोरे, व्यंकट शेळके, सचिन मंगनाळीकरसह,धर्माबाद तालुक्यातील समस्त समाज बांधव, महीला, युवक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

सराईत गुन्हेगाराची रवानगी हर्सूल कारागृहात

केज /प्रतिनिधी

खुनाचा प्रयत्न, वाटमारी, दरोडा, घरफोडी अवैद्य शस्त्र बाळगणे व दहशत पसरविणे अशा गंभीर स्वरूपाचे बारा गुन्हे असलेल्या आरोपीला केज पोलीसांनी ताब्यात घेवून महाराष्ट्र संघतीत गुन्हेगारी कायद्यानुसार त्याची रवानगी हर्सूल कारागृहात केली आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील उमेर ऊर्फ पापा मुस्ताक फोराकी वय (२८ वर्ष) हा सराईत गुन्हेगार असल्याने त्याला स्थानबध्द करण्यात आले होते. त्याच्या विरुध्द पोलीस ठाणे केज येथे खुनाचा प्रयत्न करणे, बलात्कार करणे, पळवुन नेणे, जबरी चोरी करणे, चोरी करणे, दुखापत करणे, जातीवाचक शिवीगाळ करणे, घरा विषयीक आगळीक करणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे, दंगा करणे, अवैद्या शस्त्रे बाळगणे अशा गंभीर स्वरुपाचे एकुण १२ गुन्ह्याची नोंद आहे. त्या त्यापैकी नऊ गुन्हे न्यायप्रविष्ठ असून तीन गुन्हे पोलीस तपासावर आहेत. या सराईत गुन्हेगाराने त्याची वर्तणूक सुधारावी म्हणुन यापुर्वी फौजदारी कायद्या नुसार कलम ११० प्रमाणे दि. २१ जुलै २०२३ रोजी ल प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याने प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची मालिका सुरूच ठेवली होती. त्याची केज शहर व परीसरात प्रचंड दहशत असल्याने त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नव्हते. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता.

दरम्यान जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि गुडगिरीचे उच्चाटन करण्या हेतूने जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अशा सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अर्थात एमपीडीए कायद्या गुन्हेगारांवर कार्यवाही करण्याची कठोर भूमिका घेतली आहे.

त्या नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अविनाश पाठक यांनी दिनाल. १० जुलै रोजी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या नुसार जिल्हा पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांच्या सूचना मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरक्षक श्रीराम खटावकर यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस अंमलदार प्रकाश मुंडे, संतोष गिते, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवलदार अभिमन्यु औताडे, पी.टी.चव्हाण, सानप, नारायण कोरडे, आश्विनकुमार सुरवसे यांच्या पथकाने सराईत गुन्हेगार उमेर ऊर्फ पापा मुस्ताक फोराकी दि. ११ जुलै रोजी घेतले. त्या नंतर त्याची रवानगी संभाजी नगरच्या हर्सूल कारागृहात करण्यात आली आहे.

मुंबई काँग्रेसच्या जनआक्रोश मोर्चाला परवानगी नाकारून

भाजप सरकारकडून अदानीलाच संरक्षण - खा.वर्षा गायकवाड

मुंबई:दि.११स्मार्ट मीटर व वीजदर वाढीविरोधातील मुंबई काँग्रेसच्या मोर्चाची अडवणूक, नेत्यांना पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले.अंबानींच्या लग्नातील व्हीआयपी वऱ्हाड्यांना त्रास नको म्हणून मुंबईकरांच्या प्रश्नावरील मोर्चावर सरकारकडून दडपशाही.दि.११ जुलै स्मार्ट मीटर आणि वीज दरवाढ विरोधात मुंबई काँग्रेसने आयोजित केलेल्या जनआक्रोश मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारून जनतेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसच्या नेत्यांना बीकेसी पोलीस स्टेशनमध्ये थांबवून ठेवले तर मोर्चात सहभागी होण्यासाठी येणाऱ्या बसेस व वाहनेही अडवली. शांततेच्या मार्गाने मोर्चा काढण्याचा संविधानाने अधिकार दिलेला आहे आणि तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. सरकारच्या आदेशाने पोलिसांनी मुंबई काँग्रेसचा मोर्चा अडवण्याचा प्रयत्न केला पण कोणतीही शक्ती जनतेचा आवाज दाबू शकत नाही.मुंबई काँग्रेसच्या

जनआक्रोश मोर्चाला परवानगी नाकारून भाजपा सरकारने अदानीला संरक्षण दिले, असा आरोप मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार प्रा.वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

जनआक्रोश मोर्चाबद्दल बोलताना खा.प्रा.वर्षा गायकवाड म्हणाल्या की,भारतीय जनता पक्ष प्रणित शिंदेंचे तानाशाही सरकार जनआक्रोशाला प्रचंड घाबरते. जनतेला न्याय मिळावा यासाठी मुंबई काँग्रेसने मित्रजीवी सरकार आणि अदानी कंपनीविरोधात आंदोलन केले. घरगुती वीजदरांत वाढ आणि स्मार्ट मीटरच्या विरोधातील जनक्षोभ रोखण्यासाठी सरकारने पोलिसांना पुढे करुन दडपशाही करण्याचा प्रयत्न केला.अंबानींच्या घरच्या लग्नात येणाऱ्या व्हीआयपी वऱ्हाडींना त्रास होऊ नये म्हणून मोर्चासाठी आलेल्या बसेस अडवण्यात आल्या, बीकेसी परिसरामध्ये मोर्चा आणण्यापासून थांबवण्यात आले.अदानींना संरक्षण देण्यासाठी अंबानींच्या लग्नाचा पोलीसांनी हवाला दिला.सर्वसामान्य जनतेच्या समस्यांपेक्षा अंबानींचे लग्न अधिक महत्त्वाचे आहे का? महायुती सरकारला गोरगरिबांच्या दुःखाचे काही सोयर सुतक नाही कारण हे सरकार मुठभर धनदांडग्यासाठीच काम करते हे आम्ही वारंवार सांगत आहोत.

वीज दरवाढ व स्मार्ट मीटरला सर्वसामान्य मुंबईकरांचा तीव्र विरोध असल्याने जनतेचा आवाज बुलंद करत स्मार्ट मीटर योजना व वीज दर वाढ रद्द करावी या मागण्यांसाठी मुंबई काँग्रेसचा मोर्चा होता.भाजपा सरकारने अदानीला वाचवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी मुंबईकरांच्या हक्कासाठी मुंबई काँग्रेस पुन्हा रस्त्यावर उतरण्यास मागेपुढे पाहणार नाही.महायुती सरकारच्या दडपशाहीचा मुंबई काँग्रेस निषेध करत आहे, असेही वर्षा गायकवाड म्हणाल्या.

भाजपा सरकारने पोलीसांच्या माध्यमातून अनेक अडथळे आणले तरी शेवटी या दडपशाहीला न जुमानता जनआक्रोश मोर्चा बीकेसीमधील अदानी कंपनीवर धडकला.यावेळी अदानी कंपनीच्या अधिका-यांना भेटून निवेदन दिले.खा.प्रा.वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील या जनआक्रोश मोर्चात, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री नसीम खान,अस्लम शेख, आमदार भाई जगताप,डॉ. अमरजितसिंह मनहास, सरचिटणीस सचिन सावंत, संदीप शुक्ला,प्रनील नायर, कचरू यादव,अखिलेश यादव, अजंता यादव यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

रोजगार हमीचे पैसे लाभार्थ्याऐवजी ग्रामपंचायतच्या खात्यात

कोट्यावधींची उलाढाल देते भ्रष्टाचाराला चालना - अँड. अजित देशमुख

बीड (प्रतिनिधी)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभाची कामे शेतकऱ्यांना दिली जातात. शासन नियम आणि परिपत्रकानुसार या कामाचे देयक थेट लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्याचे आदेश आहेत. मात्र भ्रष्टाचाराला मोठा वाव मिळावा म्हणून लाभार्थ्याच्या खात्याऐवजी थेट ग्रामपंचायतच्या खात्यात हे पैसे पाठविले जातात. तेथून त्याची टक्केवारीनुसार विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे लाभार्थ्याचे खाते ऐवजी ग्राम पंचायतच्या खात्यात पैसे जमा करणाऱ्या जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांवर गुन्हा नोंदवून त्यांची चौकशी करण्याची मागणी जन आंदोलनाचे विश्वस्त अँड.अजित एम. देशमुख यांनी केली आहे.

शासनाच्या धोरणानुसार रोजगार हमीची योजनेचे आयुक्त, नागपूर यांनी वैयक्तिक लाभाच्या योजनांचे कुशल देयके देखील लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा करण्याचे आदेश दि. १७ मे २०१८ रोजी या परिपत्रकांनुसार दिलेले आहेत. मात्र या आदेशाची अंमलबजावणी होत नाही, हे वरिष्ठांना माहीत असताना देखील संगणमत केले जात आहे.

धोंडराई सह जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये या प्रकारचा घोटाळा होत आहे. लाभार्थ्याने कोणत्याही योजनेचा लाभ मागितला तर त्याच्याकडून संपूर्ण कागदपत्र भरून घेणे आवश्यक असते. मात्र खाते नंबर न घेता अन्य कागदपत्रे घेतली जातात. आणि ती देखील बारकाईने तपासली जात नाहीत. कुठल्या तरी कमतरता दाखवून लाभार्थ्याला गंडविले जाते.रोजगार हमी योजनेसाठी शासनाने एक स्वतंत्र कायदा केला असून या कायद्यात या योजनांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारावर कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे. मात्र या तरतुदी देखील जिल्हा प्रशासनाने गुंडाळून ठेवल्या आहेत. प्रायोगिक तत्त्वावर धोंडराई तालुका गेवराई या ग्रामपंचायतचा कारभार तात्काळ तपासावा. त्याचप्रमाणे बीड सह आष्टी आणि परळी या दोन तालुक्यातील कारभार देखील लगेच तपासला जावा. जिल्हाभरातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना याबाबत आदेशित करण्यात यावे, अशी देखील मागणी करण्यात आली आहे.

गंभीर स्वरूपाच्या या मुद्द्यावर धोरणात्मक बदल होत नाही, तोपर्यंत आम्ही पाठपुरावा करू. दोषी अधिकारी हे आर्थिक विनियोगाचा व्यवस्थित वापर करू शकले नाहीत. शासनाचे नियम पाळले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हे नोंदवून चौकशी करण्याची मागणी देखील अँड. अजित देशमुख यांनी केली आहे.

शरीरात रक्ताची कमतरता असल्यास दररोज एक चमचा खा अळीव

मुंबई ।प्रतिनिधी

अळीवाच्या बिया भारतीय जेवणातील मुख्य पदार्थ आहे. खासकरून डिलीव्हरीनंतर महिलांना अळीवाचे लाडू दिले जातात. यात मोठ्या प्रमाणात पोषकतत्वे असतात. जर एखाद्याच्या शरीरात पोषकतत्वांची कमतरता असेल तर हे नक्की खाल्ले पाहिजे.

अळीवामध्ये फायबर, मिनरल्स, व्हिटामिन्स आणि अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात. हे आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे. दरम्यान, अळीव हे उष्ण असतात त्यामुळे अधिक प्रमाणात खाऊ नयेत. थंडीच्या दिवसाता साधारणपणे अळीव खाल्ले जातात. मात्र थोड्या प्रमाणात हे या हंगामात हे खाऊ शकता.

ज्या लोकांच्या शरीरात रक्ताची कमतरता असते त्यांनी जरूर खावे अळीवज्या लोकांच्या शरीरात रक्ताची कमतरता असेल तर त्यांनी अळीव जरूर खाल्ले पाहिजेत. यामुळे

हिमोग्लोबिनचा स्तर वाढतो. अळीव दररोज खाल्ल्याने शरीरात रक्ताची कमतरता पूर्ण होते. तसेच ॲनिमियाचा त्रास दूर होतो. याचमुळे गर्भवती महिलांना डिलीव्हरीनंतर अळीव खायला दिले जातात.भारतीय महिलांमध्ये रक्ताची कमतरता ही मोठी समस्या आहे. यासाठी खासकरून महिलांनी दररोज एक चमचा अळीव खाल्ले पाहिजे. १ चमचा अळीवाच्या बियांमध्ये १२ मिलीग्रॅम आर्यन असतात.

भारतीय नौदलात एनसीसी कॅडेटस् ना विशेष संधी-प्रा. डॉ.शिवानंद क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

एनसीसी बीड सेक्टर च्या वतीने सौ. के. एस. के. महाविद्यालयात एनसीसी व करियर मार्गदर्शन समिती अंतर्गत एनसीसी विद्यार्थ्यांसाठी भारतीय नौदल विभागात नौकरीच्या संधी या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमां मध्ये १४ नौदल अधिकारी ,एकूण १०० एनसीसी कॅडेट्स आणि ७ एनसीसी ऑफिसर्स उपस्थित होते.

लेफ्टनंट कमांडर मान यांनी सर्व कॅडेट्सना प्रेरित केले आणि नौदल सेवेबाबत त्यांच्याशी संवाद साधला.भारतीय नौदल विभाग शाळा, तांत्रिक महाविद्यालये आणि नागरी लोकसंख्येच्या विद्यार्थ्यांशी संलग्न होऊन भारतीय नौदलाच्या विविध भूमिका आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी अनेक कार्यक्रम आणि उपक्रम राबवते. महाराष्ट्राच्या उत्तर-मध्य-दक्षिण भागातील किनारपट्टीच्या जिल्ह्यांसह आणि अंतराळात पोहोचण्यासाठी मेसर्स टोयोटा (इंडियन लि.) च्या संयुक्त विद्यमाने ०८ जुलै २४ पासून २५ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या ३२ जिल्ह्यांचा महा-कनेक्ट कार ड्राइव्हचा समावेश आहे. शहरे आणि तीन रेडियलसह सुमारे ४२१० किमी (संचयी) अंतरप्रवास करणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना भारतीय नौदल सेनाच्या गौरव शाली इतिहास

व कार्याबद्दल परिचित करण्यात आले. या बरोबरच याअभियानाद्वारे एन.सी.सी.कॅडेटसनां नौदल सेवेत कोण कोणत्या प्रकारच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.या संदर्भात सखोल असे मार्गदर्शन कमांडर बलकार सिंग यांनी केले. सौ. के. एस. के. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी नौदलच्या सर्व टीमला शुभेच्छा दिल्या. एनसीसी विभाग महाविद्यालयात सदैव चांगले कार्य करत असते, यापुढेही असेच करिअर मार्गदर्शन समिती व एनसीसी विभागाद्वारे चांगल्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त करून एनसीसी विद्यार्थ्यांनाही त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळंणकर, उप-प्राचार्य डॉ. नारायण काकडे, पी.जी. डायरेक्टर डॉ. अन्सार खान, सुपरवायझर श्री. जालिंदर कोळेकर, करिअर मार्गदर्शन समिती प्रमुख डॉ. इरलापल्ले मॅडम ,कार्यालय अधीक्षक डॉ.विश्वंभर देशमाने डॉ. सुधाकर गुट्टे,एनसीसी बीड सेक्टर चे प्रमुख कॅप्टन डॉ. बी.टी. पोटे, कॅप्टन डॉ.सुनीता भोसले, लेफ्टनंट डॉ. शैलेश अकुलवार, लेफ्टनंट डॉ.जगन्नाथ चव्हाण, सेकंड ऑफिसर प्रदीप राठोड थर्ड ऑफिसर नितीन जाधव, थर्ड ऑफिसर विकास झुंजुर्के यासोबत एनसीसी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध अनुदानासाठी शासनाने शेतकऱ्यांसाठी ई केवायसी

बंधन कारक केल्यामुळे शेतकऱ्यापुढे मोठे संकट! वसंत मुंडे

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारने शेतकऱ्याला पिक विमा योजना, अतिवृष्टीचे नुकसान भरपाई, दुष्काळात झालेले नुकसान भरपाई साठी महसूल विभागामार्फत मिळणाऱ्या योजनांचे अनुदान डीबीटी माध्यमातून बंधनकारक ई केवायसी शेतकऱ्यांसाठी केलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्याला रोज रोजगार बुडून शेतीतले कामे बाजूला ठेवून ई केवायसी करण्यासाठी वेळ द्यावा लागतो. तरी ही सर्व्हर डाऊन असल्यामुळे चार ते पाच दिवस शेतकऱ्याचे फुकट ई केवायसाठी जात असल्यामुळे शासनास शेतकऱ्या बद्दल सहानुभूती नसल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. निसर्गाची साथ नाही बाजार पेठे मध्ये शेतीमालाला भाव नाही खते बी बियाणे

कीटकनाशके औषधी व रोजगारात प्रचंड वाढ झालेली असल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाला तोंड देत आहे, बँकेतून वेळेवर कर्ज मिळत नाही ई केवायसी केंद्रा कडून शेतकऱ्याची आर्थिक लूट केली जाते ,शासनाच्या अनेक धोरण चुकीचे असल्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सर्व बाजूने हातबल झालेला असून विविध कर व अटी शेतीमालावर टाकल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात आहे. तरी ही महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारला काही ही देणे घेणे नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. शासनाचे चुकीचे धोरण ई केवायसी संदर्भात असल्यामुळे दुरुस्ती करण्याची मागणी सर्व स्तरात शेतकरी वर्गाकडून होत असून शासनाचे जे काही अनुदान असेल ते त्वरित खात्यामध्ये वर्ग करून सहकार्य करावे व गाव पातळीपर्यंत शासनाचे योजनेची अंमल बजावणी करण्यासाठी ई केवायसी संदर्भात केंद्र स्थापन करून शेतकऱ्याला प्रत्येक वर्षी करण्या ऐवजी दोन वर्षाला ई केवायसी करण्यात सवलत देण्यासंदर्भात आदेश पारित करावे अशी निवेदनाद्वारे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

२२ जुलै रोजी ठेवीदारांसह रास्तारोको करणार : प्रा.सचिन उबाळे

पोलिस अधीक्षक कार्यालयात ठेवीदारांसह मांडला ठिय्या

बीड । प्रतिनिधी
ज्ञानराधा,साईराम, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), लक्ष्मीमता अर्बन,जिजाऊ मल्टीस्टेटचे अध्यक्ष बबन शिंदे,साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे उपअध्यक्ष यशवंत कुलकर्णी, परमेश्वर राठोड,तसेच सर्व मल्टिस्टेट पतसंस्थांच्या संचालक मंडळांना अटक करावी व ठेवीदारांच्या ठेवी तात्काळ मिळाव्यात या साठी पोलिस प्रशासनाला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी ३ जुलै रोजी देत उपोषण मागे घेतले होते.

दरम्यान शुक्रवारी (दि.१२) प्रा.उबाळे यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात ठेवीदारांसह ठिय्या मांडला. या नंतर पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेतली. यावेळी उबाळे यांनी पोलिसांनी दिलेले आश्वासन पंधरा दिवसांत पूर्ण करावे नसता २२ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठेवीदारांसह रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा प्रा. सचिन उबाळे यांनी दिला आहे. दरम्यान २० जुलै रोजी बीड येथे मराठवाड्यातील सर्व ठेवीदारांची महत्वपूर्ण बैठक आयोजित केली असल्याचे उबाळे यांनी सांगितले.

२० जुलै रोजी मराठवाड्यातील ठेवीदारांची बैठक

आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) परळी पीपल्स या पतसंस्थांमध्ये बीडसह मराठवाड्यातील ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. यामुळे आगामी रणनिती ठरविण्यासाठी २० जुलै रोजी बीड येथे मराठवाड्यातील ठेवीदारांची महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे प्रा.उबाळे यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) परळी पीपल्स यांच्या विरोधात स्वाभिमान संघटनेचे जिल्हाप्रमुख प्रा.सचिन उबाळे यांचे उपोषण ३ जुलै रोजी प्रशासनाच्या मध्यस्तीने तत्पुरते स्थगित करण्यात आले होते. यावेळी साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट ज्ञानराधा मल्टिस्टेट, साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे उपअध्यक्ष यशवंत कुलकर्णी तसेच सर्व पतसंस्थांच्या संचालक मंडळांना अटक करावी या साठी प्रा.उबाळे यांनी प्रशासनाला पंधरा दिवसांला अल्तीमेटम दिला आहे. या संदर्भात उबाळे यांनी आज पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेतली व चर्चा केली. यावेळी ज्ञानराधाच्या शिरुर शाखेतील दोन कर्मचारी व जिजाउ मल्टिस्टेट च्या संचालक यांना अटक केल्याचे सांगण्यात आले. मात्र परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे उपअध्यक्ष यशवंत कुलकर्णी यांना अद्यापही अटक केली नाही. यामुळे प्रशासनाला १५ दिवसांचा दिलेला अल्टिमेटम अजून पूर्ण झाला नाही. जर वेळेत प्रशासनाने मागणी मान्य केली नाही तर २२ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठेवीदारांसह रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा प्रा. सचिन उबाळे यांनी दिला आहे.

महावितरण मधील कंत्राटी कामगारावर उपासमारीची वेळ

सोळा तारखेपासून ४२ कामगारांचे आमरण उपोषण

पाटोदा । प्रतिनिधी

केज तालुक्यातील हातावर पोट असणारे अनेक महावितरण कंत्राट कामगारावर तीन महिन्यापासून पगार नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे १६ /७/ २०२४ पासून ४२ कंत्राट कामगार बीड मंडळ कार्यालय येथे आमरण उपोषणाला बसणार आहेत. याविषयी सविस्तर वृत्त असे की, सर्व विविध कंत्राटी कामगार केज विभाग यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे की आम्हाला माहे एप्रिल, मे, जून, तीन महिन्याचे पगार अजून झाला नाही. आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तीन महिने पगार नसल्याने आम्ही आमच्या घरात किराणा भरू शकत नाही, घरातील व्यक्ती आजारी पडल्यावर आमच्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत. पगार नसल्याने मुलांच्या शिक्षणाचा खर्च करू शकत नाहीत. स्वतःच्या तब्येतीची काळजी घेऊ शकत नाहीत. आई-वडिलांना मेडिकलच्या गोळ्या देऊ शकत नाहीत. एक आवर्जून विनंती आम्हा कामगार यांच्या घरात कोणाचे आई-वडील आजारी तर, कोणाची बायको चा दवाखाना तर, कोणाच्या लेकरांचे शिक्षण या कामावर अवलंबून आहे. म्हणून साहेबांना विनंती आहे लवकर आमची पगार करावी. आपल्या माहितीस्तव असे निवेदन देऊन यावर काही दखल घेण्यात आली नाही तर आम्ही सर्व कामगार दिनांक १३/७/ २०२४ पासून काम बंद आंदोलन करणार आहोत. व १६ /७/ २०२४ पासून मंडळ कार्यालय बीड या ठिकाणी आमरण उपोषन केज सब- डिव्हिजन मधील ४२ कामगार करणार आहोत. जोपर्यंत तीन महिन्याचे पेमेंट मिळत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील यामध्ये काही अनुचित प्रकार घडला तर याची सर्व जबाबदारी आपल्या कार्यालयाचे अधिकारी प्रशासनाकडे असेल.पगार नसल्याने आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. असे निवेदनाद्वारे ४२ कंत्राट कामगारांनी म्हटले आहे. तरी संबंधित प्रशासनाने कंत्राट कामगारांच्या निवेदनाची दखल घ्यावी अशी मागणी कंत्राट कामगारांनी निवेदनाद्वारे केली आहे.

साहेब, आम्हाला आमचे जुनेच गुरूजी परत द्या!

विद्यार्थ्यांची थेट शिक्षणाधिकाऱ्यांकडे मागणी

गेवराई । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील तांदळवाडी हवेली येथील शिक्षकाची बदली गेवराई तालुक्यात झाली आहे. परंतू ही बदली रद्द करून तेच शिक्षक पुन्हा आमच्या शाळेत परत करा, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी थेट जिल्हा परिषद गाठून शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेतली. काही वेळ हे विद्यार्थी त्यांच्या दालनासमोरही बसले होते. काही वेळाने चर्चा झाल्यावर मागण्यांचे निवेदन दिले आणि आंदोलन मागे घेण्यात आले. यशवंत सेनेचे नेते भारत सोन्नर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

तांदळवाडी हवेली येथे जिल्हा परिषदेची चौथीपर्यंत शाळा आहे. त्या ठिकाणी दोन शिक्षकांची नियूक्ती आहे. यातील एका शिक्षकाची बदली गेवराई तालुक्यात झाली असून त्या जागी माजलगाव तालुक्यातील

शिक्षकाची नियूक्ती झाली आहे. परंतू जुनाच शिक्षक पुन्हा परत देण्यात यावा, या मागणीसाठी या गावातील विद्यार्थ्यांनी शुक्रवारी आंदोलन केले. जिल्हा परिषद गाठून शिक्षणाधिकारी यांच्या दालनासमोर ठिय्या मांडला. शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी सर्व प्रक्रिया समजावून सांगितल्यावर आंदोलकांचे समाधान झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन फुलारी यांना दिले.

दरम्यान, फुलारी यांनी प्रतिनियूक्तीचा हा अधिकार विभागीय आयुक्तांना आहे. यासंदर्भात प्रस्ताव पाठवला जाईल, असे अश्वासन दिल्याची माहिती भारत सोन्नर यांनीदिली. यावेळी गावचे सरपंच कैलास निर्मळ, उपसरपंच रामनाथ यमगर, राजाराम निर्मळ, नारायण निर्मळ, सुनील पवार, भारत कोळेकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

मुंबई येथील पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयात इशाद भाईंनी ताईची भेट करत शुभेच्छा दिल्या असताना ताईंकडून भाऊंसाठी अनमोल शब्द.. माझा खरा भाऊ माझ्यासाठी झटणारा स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा एकनिष्ठ म्हणून सदैव आम्हा मुंड्या परिवारांसोबत कायम एक राहिलेला इरशाद भाई आपण माझ्या सत्कारासाठी आलात आपली मी खूप खूप आभारी आहे असे उद्गार नवनिर्वाचित विधानपरिषद आमदार पंकजाताई मुंडे यांनी इरशाद भाईला काढत इरसात बाईच्या कार्याचं कौतुक केले

मराठा जनजागृती व शांतता रॅली निमित्त चहा व नाश्त्याची सोय:-पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

बीड। प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची शांतता रॅली काढण्यात आली होती या रॅलीत बीड जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातून मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता या रॅलीत मराठा बांधवांची गैरसोय होऊ नये यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेकडून पाणी व नाष्टाची उत्तम सोय जिल्हा परिषद येथे स्टॉल लावून करण्यात आली होती अशी माहिती ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकातून दिली ऑल इंडिया पँथर सेना सुरुवातीपासूनच सामाजिक प्रश्नांवर अन्याय अत्याचारावर आवाज उठवण्याचे काम करत आलेली आहे तसेच मराठा आरक्षणासाठी करोडोचे मोर्चे काढणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात त्या त्या ठिकाणी पक्षाचे कार्यकर्ते आपला सहभाग नोंदणीत आले आहेत ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या मार्गदर्शनाखाली बीडमध्ये मराठा समाज बांधवांच्या मोर्चात पाणी व नाश्ता याची सोय करून ऑल इंडिया पँथर सेनेने सामाजिक बंधुभाव जोपासला आहे या कार्यक्रमास नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना, वसीम भाई शेख, ज्ञानेश्वर कवठेकर, सुधीर कतले, गुड्डू जावळे, राजेश चव्हाण, मोबीन शेख, व संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

मराठा जनजागृती व शांतता रॅली निमित्त चहा व नाश्त्याची सोय:-पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

बीडमध्ये मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची शांतता रॅली काढण्यात आली होती या रॅलीत बीड जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातून मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता या रॅलीत मराठा बांधवांची गैरसोय होऊ नये यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेकडून पाणी व नाष्टाची उत्तम सोय जिल्हा परिषद येथे स्टॉल लावून करण्यात आली होती

अशी माहिती ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकातून दिली ऑल इंडिया पँथर सेना सुरुवातीपासूनच सामाजिक प्रश्नांवर अन्याय अत्याचारावर आवाज उठवण्याचे काम करत आलेली आहे तसेच मराठा आरक्षणासाठी करोडोचे मोर्चे काढणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात त्या त्या ठिकाणी पक्षाचे कार्यकर्ते आपला सहभाग नोंदणीत आले आहेत ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या मार्गदर्शनाखाली बीडमध्ये मराठा समाज बांधवांच्या मोर्चात पाणी व नाश्ता याची सोय करून ऑल इंडिया पँथर सेनेने सामाजिक बंधुभाव जोपासला आहे या कार्यक्रमास नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना, वसीम भाई शेख, ज्ञानेश्वर कवठेकर, सुधीर कतले, गुड्डू जावळे, राजेश चव्हाण, मोबीन शेख, व संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

त्या लिंगपिसाट दोन्ही कर्मचाऱ्यांनवर ॲट्रॉसिटी दाखल करणार-शुभम धन्वे

दि. बीड मधील नगर परिषद घरकुल साठी पैसै देण्याची पद्धत फक्त कानावर होती मात्र चेक महिला लाभार्थीकडेच लिंगपिसाट अधिकारी यांनी आम्हाला खुश कर अशी मागणी केली व ब्लॉकमेल करून अपमान चेक काढुन देतो आसे आमिष दाखवुन शारीरीक शोषण करणे सदरील कर्मचारी राकेट चालवून अनेक संसार उद्धस्त केले आहेत पण भिती पोटी लाभार्थी पुढे येत नाहीत त्यामुळे या कर्मचाऱ्यांना वर्ष न वर्ष एकाच विभागात राहुन अफाट संपत्ती कमवलेली आहे यांच्या सर्व संपत्तीची चौकशी करावी या विभागातील नगर परिषद बीड च्या कार्यालय मध्ये न बसता स्वा:ताच्या मालकीच्या घरात स्पेशल रूम मध्ये देणे घेणे चालु आसते काळ्या भस्मासुरचा पापाचा घंडा उघडा करणार पोलीस स्टेशनला तक्रार करणार आहे

नगर परिषद घरकुल विभागात रमाई आवास योजने अंतर्गत एका महिलेला घरकुल मंजूर झाले यासाठी ती महिला त्या विभागातील एका कर्मचाऱ्यांकडे गेली आसता आम्हा खुश कर अशी मागणी केली तुझे जे काही काम आसेल ते मी दोन मिनिटात पुर्ण करतो फक्त आम्हाला खुश कर काम करण्यासाठी महिलेकडुन पैसै घेऊन आशा गलिछ भाषेचा वापर करून महिलेचा अपमान करण्यात आला ट्रॉसिटी अंतर्गत आशा

कर्मचाऱ्यांनवर गुन्हा नोंद करावा अशी मागणी शुभम धन्वे यांनी जिल्हाधिकारी यांच्या मागणी करण्यात आले बीड नगर परिषद बांधकाम विभाग या ठिकाणी अनेक घोटाळे उघडकिस आणले आणले आहे पण त्या घोटाळा अधिकारी गोड बोला अधिकारी यांना ही त्या घोटाळ्यामुळे निलंबित करावे अशी मागणी प्रत्येक वेळी केली आसुन मुख्याधिकारी निता अंधारे सतत पाठीश घालत आहेत भंडार विभातही ही बोंब आहे मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या काळात फक्त घोटाळे महिलेची छेडझाट सत्र चालु आहे हे कधी व कुटे बंद होणार आशा कर्मचाऱ्यांनमुळे व कंट्रक्शनवाल्या लोकांन मुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे कायमच आशा कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त करण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे लवकर कार्यवाही होईल अशे आश्वासन देण्यात आले आहे

प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेत मोठा भ्रष्टाचार; गोरगरीबांचे गॅस कनेक्शन दुसऱ्यांनाच दिले

चौकशी करून दोषी गॅस एजन्सी वितरकांचे परवाने रद्द करा

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचे तसेच गोरगरिबांचे गॅस कनेक्शन दुसऱ्यांना दिल्याचे निदर्शनास येत आहे. याविषयी सखोल चौकशी करून दोषी गॅस एजन्सी वितरकांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात यावे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, मोहज़ीब इनामदार, शेख रईसोद्दीन आणि इरफ़ान बागवान यांनी दिला आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, काही वर्षांपूर्वी केंद्र शासनाकडून गोरगरीब कुटुंबीयांकरीता प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना राबविण्यात आली होती. शासनाच्या धोरणानुसार या योजनेतून वितरण करण्यात आलेल्या गॅस कनेक्शन ची आता केवायसी करण्याचे आदेश आले आहेत. म्हणून या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री उज्वला गॅस कनेक्शन ज्यांच्या नावावर दिलेले आहेत, त्यांना केवायसी करून घेण्यासाठी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर मेसेज येऊ लागले आहेत आणि इथेच नेमका घोटाळा झाला. गॅस एजन्सी वितरकांनी सर्वसामान्य गोरगरीब निरक्षरांचे गॅस कनेक्शन स्वतःच्या तसेच पुढार्यांच्या सोबत मिळून संगनमताने जवळच्या लोकांना दिले. गोरगरिबांच्या नावाने मिळालेले गॅस कनेक्शन घेतल्यापासून आतापर्यंत हा धंदा बिनबोभाट चालू होता. परंतु आता केवायसी करावी लागत असल्याने ज्यांच्या नावाने गॅस कनेक्शन देण्यात आले आहे, त्यांच्या मोबाईलवर जेव्हा यासाठी मेसेज पडू लागले तेव्हा एकच खळबळ उडू लागली आहे. अनेकांना तर ४४० व्होल्ट चा झटका लागावा त्याप्रमाणे करंट लागत आहे. कारण प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत ज्यांनी गॅस कनेक्शन घेतलेच नाही अशा सर्वसामान्य गोरगरीब व अशिक्षितांना केवायसी करून घेण्याचे मेसेज येत असल्याने अनेक जण गॅस एजन्सी मध्ये जाऊन जेव्हा विचारपूस करू लागले तेव्हा हा सर्व प्रकार उघडकीस येऊ लागला आहे. जेव्हा प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत गॅस कनेक्शनचे वितरण केले जात होते तेव्हा खऱ्याखुऱ्या गरजवंत गोरगरिबांपेक्षा गॅस एजन्सी वितरकांनी अशा लोकांऐवजी भलत्यांनाच गॅस कनेक्शन दिलेले आहे. त्यात अनेक राजकीय कार्यकर्ते आणि पुढाऱ्यांचाही समावेश आहे. गॅस वितरकांसह कार्यकर्ते आणि पुढार्यांनी मिळून एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या धोरणानुसार संगनमताने गट्टी जमवून धनदांडग्यांना गॅस कनेक्शन दिले आहे. ज्यांनी प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत चोरट्या मार्गाने गॅस कनेक्शन मिळविले असे लोक या कनेक्शनच्या माध्यमातून मिळालेले गॅस सिलेंडर घरांसोबतच चार चाकी गाड्या, तीन चाकी ऑटो रिक्षात सर्रासपणे गॅस वापरू लागले आहेत. हा सर्व उद्योग आतापर्यंत बिनबोभाट सुरू होता परंतु आता केवायसी करावी लागत असल्याने याचे बिंग फुटू लागले आहे. प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येत असून खरेखुरे गरजवंत सर्वसामान्य गोरगरीब अशिक्षित या योजनेतून मिळणाऱ्या गॅस कनेक्शन पासून वंचित राहिले आहेत. अशा लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या नावे वितरित करण्यात आलेले गॅस कनेक्शन त्यांना मिळवून देण्यासाठी, गॅस एजन्सी वितरकांकडून व पुढार्यांकडून या योजनेत करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी. योजनेत भ्रष्टाचार केलेल्या गॅस एजन्सी वितरकांचे परवाने रद्द करण्यात यावेत. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातून एस.एम.युसूफ, डॉ. संजय तांदळे, मोहज़ीब इनामदार, शेख रईसोद्दीन आणि इरफ़ान बागवान यांनी दिला आहे.

सांगोला तालुक्यातील महूद येथे मातंग युवकाची हत्या

दलित महासंघाच्या वतीने तीव्र निषेध

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामधील महूद येथे गुरुवार, दिनांक ११ जुलै २०२४ रोजी सुनील कांबळे या तरुणाची त्याच गावातील रामोशी समाजातील दोन तरुणांकडून मातंग समाज मंदिरासमोर येऊन कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली आहे. हत्या झाल्यानंतर पोस्टमार्टम करून महूद मध्ये प्रेत आणण्यात आले परंतु जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत प्रेताचे दहन करणार नाही भूमिका मातंग समाजाने आणि दलित महासंघाच्या कार्यकर्त्यांनी घेतली. महूदच्या मुख्य रस्त्यावर सकाळ पासून रास्ता रोको करण्यात आला. दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे सांगोला तालुक्याचे पी आय श्री. खंदारे आणि सांगोला विभागाचे डी वाय एस पी श्री. गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्कात होते. अखेर डी वाय एस पी श्री. गायकवाड यांनी आरोपींना अटक केल्याचे महूद मधील मातंग समाजाला व कार्यकर्त्यांना सांगितले. दूरध्वनीवरून प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे

यांच्याशीही चर्चा केली.

एका अतिशय होतकरू तरुणाची हत्या झाल्यामुळे मातंग समाजामध्ये असंतोष असून संपूर्ण गावामध्ये दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

सर्वर डाऊन असल्याने तहसील मधून विविध प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी

धारूर । प्रतिनिधी

सर्वर डाऊन असल्या कारणाने तहसील मधून मिळणाऱ्या विविध प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत त्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना व शालेय विद्यार्थ्यांना लागणारी विविध प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत रहिवासी उत्पन्नाचा दाखला जात प्रमाणपत्र सह इतर प्रमाणपत्र तहसील कार्यालयाच्या ऑनलाइन प्रणाली द्वारे वाटप केले जातात परंतु मागील दहा ते बारा दिवसापासून सर्वर डाऊन असल्यामुळे विद्यार्थी व लाडकी बहीण योजना चा लाभ घेण्यास अडचणी येत आहेत.

शाळा महाविद्यालय सुरू झाली आहेत विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र वडिलांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र रहिवासी प्रमाणपत्र ची आवश्यकता लागते परंतु दि १/७/ २०२४ पासून तहसील कार्यालयाचे सर्वर डाऊन असल्यामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशाकरिता अडचणी येत आहेत तसेच नुकतीच जाहीर केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण माझी या योजनेसाठी देखील पतीच्या उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे महिलांना सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करताना आपल्या पतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे परंतु मागील १० ते १२ दिवसापासून सर्वर डाऊन असल्यामुळे महिलांना देखील नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून विद्यार्थी व महिलांना प्रमाणपत्र सुरळीत वाटप करावेत अशी मागणी महिला व विद्यार्थ्यांमधून केली जात आहे.

संजयगांधी संदस्यानी पात्र लाभार्थ्यांचे मंजुरी पत्र वाटप करण्याचे तहसिदारांना निवेदन

संगायो अध्यक्ष व तहसिदार यांना संगायो सदस्य कंटाळले

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील संजयगांधी,श्रावणबाळ, इंदिरागांधी, योजनेतील मंजुर लाभार्थ्यांची पत्र वाटप करत नसल्यामुळे संगायो अध्यक्ष व तहसिलदार याच्या अढ मुट पणाला संगायो सदस्य कंटाळले असुन स्वताह सदस्यांनी तहसिलदार यांना मंजुर लाभार्थ्यांना पत्र वाटप करण्यासाठी निवेदन दिले.

सविस्तर असे की महाराष्ट्र शासनातर्फे अपंग, निराधार, विधवा, वयोवृध्द यांच्यासाठी संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजना या अंतर्गत मिळणारे मासीक मानधन १५००/- रूपये प्रमाणे मिळते. या योजनेकरीता लाभार्थी निवडीसाठी तालुकास्थरावर १० लोकांची सदस्य कमीटी निवडण्यात येते. संबंधीत अध्यक्ष व सदस्य आधारे गेवराई तहसिल कार्यालयात दाखल झालेल्या अर्जाची छाणनी करून पात्र लाभार्थ्यांसं मंजुरी देण्यात येते. गेवराई तालुक्यातील

संजय गांधी व श्रावणबाळ योजनेची सदस्य कमीटी गेल्या दिड वर्षापुर्वी स्थापन झाली. त्या कमीटीमध्ये मी दत्ता राम गिरी रा. ताकडगाव, अपंग बांधवापैकी एक सदस्य आहे. सदर कमीटी स्थापन झाल्यानंतर दिनांक २१/११/२०२३ रोजी संजय गांधी व श्रावणबाळ योजनेची तहसिल कार्यालय गेवराई येथे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये गेवराई तहसिल कार्यालय येथे १२००० अर्जदारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दिनांक २१/११/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ४००० पात्र लाभार्थ्यांची अर्ज मंजुर करण्यात आले. परंतु सदर बैठकीला सात महिने झाले परंतु आज पर्यंत संबंधीत लाभार्थ्यांना व संबंधीत संगायो अध्यक्ष जे.डी.शहा यांच्या अंतर्गत मनमानी कारभार सुरु असल्यामुळे निराधारांना त्रास सहन कराव लागत आहे. अध्यक्षांची भुमिका मी म्हणजेच कमीटी व मी म्हणजे सर्व काही यांच्या या वागणुकीमुळे गेवराई तालुक्यातील ४००० पात्र लाभार्थ्यावर आपल्या शासकीय कार्यालयात व चकरा मारून, उपासमारीची वेळ आली आहे. पात्र लाभार्थ्यांचा वेतन रखडले आहे. संबंधीत कमीटीचे अध्यक्ष हे एक कोटयाधिश असल्याकारणाने त्यांना ४००० पात्र लाभार्थ्यांची काय जाणीव राहिल. सात महिन्याचे मानधन कोटयाधिश कमीटीचे अध्यक्ष स्वतःच्या खिशातुन देणार का या कारणामुळे आजपर्यंत गेवराई तालुक्यातील मंजुरी पत्र देण्यात आली नाही व आज पर्यंत संबंधीत गेवराई तालुक्यातील अंध,अपंग, निराधार,विधवा, यांना कोणतेही मंजुरीपत्र देण्यात आलेंले नाही. तरी मा. तहसिलदार साहेब यांनी फक्त संगायो अध्यक्ष यांच्यामुळे गेवराई तालुक्यातील ४००० लाभार्थ्यावर अन्याय होवू नये. यामुळे गोरगरीब ४००० पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र द्यावे असे गेवराई संजयगांधी सदस्य दत्ता गिरी यांनी निवेदनद्वारे मागणी केली आहे.

बीड जिल्हा शासकीय रुग्णालय हे रामभरोसे चालत आहे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक तपासणीसाठी आणि औषधासाठी तर पडत आहेत जिल्हाधिकारी आणि प्रशासनाला जाग कधी येणार सौ विद्याताई जाधव पाटील

बीड जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये सीएस बडे दाखवा आणि बक्षीस मिळवा ही योजना राबवणार...

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयामध्ये सध्या सर्व अनागोंदा कारभार चालू आहे गेल्या एक वर्षापासून रुग्णांची हेळसांड होत आहे रुग्ण औषधाविना तडपडत आहेत ओपीडी मध्ये डॉक्टर बसत नाहीत तर मेडिसिन विभागांमध्ये गोळ्या औषध उपलब्ध नाहीत शासकीय जिल्हा रुग्णालय आहे हे काही तालुका रुग्णालय नाही किंवा गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र नाही बीड जिल्हा शासकीय रुग्णालय येथे जिल्ह्यातील पेशंट उपचार करण्यासाठी येतात जिल्ह्यातील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना जिल्ह्याचे शल्य चिकित्सक म्हणून डॉक्टर बडे यांची नियुक्ती झाली आहे अद्याप मात्र जिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्षरीत्या कोणतही काम करताना आम्ही डॉक्टर बडे यांना पाहिलं नाही किंवा त्यांच्याविषयी ऐकलं नाही सातत्याने रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक आम्हाला फोन करून सांगतात आम्ही ज्यावेळेस जिल्हा रुग्णालयामध्ये जातो प्रत्यक्ष वार्डामध्ये असेल किंवा ओपीडी मध्ये असेल आमच्यासारख्या पदाधिकाऱ्यांना जर डॉक्टर राऊंड घेताना दिसत नाहीत तर मग सामान्य लोकांना कसं काय उपचार मिळेल असा प्रश्न पडला आहे अनेक वेळा शासकीय जिल्हा रुग्णालयामध्ये जिल्हा शालिक डॉक्टर बडे यांना भेटून रुग्णांच्या बाबतीत निवेदन देण्यासाठी किंवा चर्चा करण्यासाठी आम्ही प्रयत्न केला मात्र सातत्याने त्यांचा फोन नोटरीचेबल किंवा फॉरवर्ड असतो डॉक्टर पारखे यांना भेटा तेच सध्या जिल्हा रुग्णालयाचा कारभार सांभाळत आहेत अशी चर्चा वस्तुस्थिती सध्या बीड शहरामध्ये आणि बीड जिल्ह्यामध्ये आहे खाजगी रुग्णालयामध्ये रुग्णांची हेळसांड होते लूट होते यामुळे सरकारने जिल्हा रुग्णालयामध्ये मोफत उपचार करण्याचे स्वप्न जनतेला दाखवला आहे लोकांना दाखवला आहे दुष्काळी परिस्थितीमध्ये पाऊस नाही कामधंदा नाही दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्या करत आहेत तसेच रोगराईचे प्रमाण वाढला आहे आणि अशा परिस्थितीमध्ये जिल्ह्याची शासकीय रुग्णालयातील उपचार करण्याची प्रणाली ही खूप बदलली आहे रुग्णांना उपचार केल्या जात नाहीत डॉक्टर राऊंड घेत नाहीत जिल्हा रुग्णालयात स्वच्छता नाही तपासणी होत नाही गोळ्या औषध उपलब्ध नाहीत जिल्हा प्रशासन असेल किंवा सरकारच्या कोणत्याही लोकप्रतिनिधी याकडे लक्ष नाही काही दिवसापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा आमदार संदीप भैया शिरसागर यांनी जिल्हा रुग्णालयांमध्ये जाऊन आढावा घेतला होता त्यावेळेस काही परिस्थिती सुधारली होती त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी जिल्हा रुग्णालयामध्ये जाऊन जिल्हा रुग्णालयाची पाहणी करून होत असलेल्या त्रासाबद्दल प्रसारमाध्यमांसमोर येऊन जिल्हा रुग्णालयाचे अवस्था मांडली होती मात्र आणखीन तरी जिल्हा रुग्णालयातील ढेपाळलेला कारभार हा सुधारलेला नाही आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या युती बीड जिल्हा अध्यक्ष या नात्याने जिल्हा प्रशासनाला सांगू इच्छितो लवकरात लवकर जर बीड जिल्हा रुग्णालयाचा अनाकोंडा आणि भ्रष्ट कारभार थांबला नाही तर जिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये लोकशाही मार्गाने रुग्णांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सोयीसाठी आंदोलन करण्याचा इशारा सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभला दिलेल्या प्रसिद्धी पत्राद्वारा देत आहोत

कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त लिंबागणेश जिप शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

लिंबागणेश । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यशील तथा संवेदनशील कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय जी मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि.१२ शुक्रवार रोजी लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शालेय शिक्षण साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक अभय सुरेश वनवे यांच्या संकल्पनेतून हा शालेय शिक्षण साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी मनोगत व्यक्त करताना होर्डिंग्ज आदीवर व्यर्थ खर्च करण्यापेक्षा शालेय शिक्षण उपयोगी वस्तू देऊन विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लागावा यासाठी आपण प्रयत्नशील असून कायम सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करणार आहोत.या कार्यक्रमास लिंबागणेश गावचे सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, ग्रां

.स.समीर शेख, ,अक्षय वाणी, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे ,सेवा सहकारी सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवा नेते विक्रांत वाणी, विवेक जाधव,स्वप्निल निर्मळ, बालाजी निर्मळ, अभिजीत गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी शालेय मुख्याध्यापक आबासाहेब हांगे , सहशिक्षक अमर पुरी, भरत चौरे ,संदिपान आगम, माधुरी कुलकर्णी, सुवर्णा अयाचित उपस्थित होते.

आई-वडिलांच्या नंतर मुलाला घडविण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या शिक्षिका,श्रीमती तळेकर मॅडम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना राजीव गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक काळे सर,श्री.मोरे सर, श्री तुपे सर, श्री चलवदे सर, श्री लव्हराळे सर,श्रीमती सावंत मॅडम व विद्यार्थी यांच्या वतीने रितेश ओव्हाळ, आर्यन धुनघव, क्रिश लांडगे व इतर

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बैठक संपन्न

शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉईंट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षपदी तुकाराम वाघमारे. ऊर्फ तात्या, उपाध्यक्ष बाळासाहेब दोडके, परमेश्वर शिंदे सचिव, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या वेळी उपस्थित नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड, जिल्हा परिषद पॉइंट बीड चे अध्यक्ष राजु भाऊ भोसले, अशोक थोरात, विनोद वडमारे, राजरतन वडमारे, संदीप भांबे, जालिंदर पाखरे,

नवनाथ डावकर, सुनील काळे, रंजीत वाघमारे, अमोल लोखंडे, जालिंदर वारे, अशोक क्षीरसागर, राजू वाघमारे, भगवान पंधारे, कैलास वंजारे, शंकर मोरे, बाबा शेळके, रजाक पठाण, जमील शेख, नवी पठाण, संजय पायगुडे, बाबा शिंदे, तात्या कदम, राजेश चव्हाण, हनुमंत ननवरे, विनोद मस्के, अशोक राठोड, परमेश्वर पवार, कृष्णा राठोड, गिरधारी मोरे, सुनील काळे, अभिमान डोंगरे, गोरख ठोकरे, दादा शिंदे, उगले मामा, हनुमान जगदाळे, काळकुटे, प्रवीण सुदामे, ऋषिकेश बेदरे, धर्मेंद्र शिंदे, भरत सांगोळे, मोहन वाघमारे, विकास गोटे, जय राम बांगर, अण्णा शिणगारे, अंगद धनवे, दादा ढवळे, अमोल जोगदंड, नितीन मुंडे, प्रमोद वडमारे, व शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉइंट बीड या सर्वांच्या सर्वानुमते ही निवड करण्यात आलेली आहे व इत्यादी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT